# केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत

## जोडपत्र - (अ) नमुना पत्र ३

5 रु. कोर्ट फी Rs.5 COURT FEE भारत INDIA पाँच रुपये FIVE RUPEES

5 रु. कोर्ट फी Rs.5 COURT FEE भारत INDIA पाँच रुपये FIVE RUPEES

22/05/2024

**प्रति,**

**मा. शासकिय जनमाहिती अधिकारी,**
परिवहन विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर पश्चिम.

**१) अर्जदाराचे संपुर्ण नाव -** नटराज गोविंद सुर्यवंशी

**२) पत्ता -** शॉप नं. ०५ श्रीकृष्ण अपार्टमेंट, विमल डेअरी जवळ, शिर्डी नगर, नवघर - फाटक रोड, भाईंदर पूर्व, मिरा-भाईंदर शहर, ता. जि.- ठाणे. ४०११०५

**संपर्क -** ८३६९२०९९०३

**ई-मेल -**

**३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील,**

**१) माहिती विषय -** मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत असलेल्या परिवहन विभागामार्फत अस्थापनेमध्ये कंत्राटी मनुष्यबळ सेवा हि ज्या संस्थेच्या माध्यमातून पुरविण्यात आली आहे त्यां संस्थेचे सदर कालावधीमधिल सर्व कागदपत्रे, कार्यादेश प्रत, करारनाम्यांच्यी प्रत, सुरक्षा अनामत रक्कम भरलेली पावती, संस्थेने आजपावेतो केलेल्या कार्यरत कर्मचाऱ्यांच्या नावे असलेल्या वेतनांच्या प्रति, संस्थेचे बँक पत्रक, ईपीएफ भरणा केलेल्यांची चलणे, देयकांच्या प्रति मिळाव्यात.

**२) माहितीशी संबंधित कालावधी -** जाने - २०२२ पासुन ते आजपर्यंत.

**३) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन -** वर विषयात नमुद केलेल्याप्रमाणे.

**४) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तिशः -** व्यक्तिशः
**आवश्यक आहे किंवा नाही कसे**
**(प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये )**

**४) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील आहे. किवा नाही. -** नाही

**ठिकाण -** भाईदर पूर्व.
**दिनांक-** 22/04/2024

22/5/24.
**अर्जदाराची सही**

मिरा भाईंदर महानगरपालिका
परिवहन उपक्रम
आवक क्र. मा.अ. 03
दिनांक 22/05/2024

**अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त**
**(मालमत्ता व्यवस्थापन) यांचे कार्यालय,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका,**
**भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०१ १०१.**
**जा.क्र.माअधि/अपिल/ ९४ /२०२४-२५**
**दि. २६/०७/२०२४**

**<u>प्रथम अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त (मालमत्ता व्यवस्थापन), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.</u>**

श्री. नटराज गोविंद सुर्यवंशी,
शॉप नं.०५, श्रीकृष्ण अपार्टमेंट,
विमल डेअरी जवळ, शिर्डी नगर,
नवघर फाटक रोड, भाईंदर (पूर्व),
ता.जि.ठाणे ४०११०५.

............... अपिलार्थी

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकिय अधिकारी (परिवहन)
मिरा भाईंदर महानगरपालिका.

...............प्रतिवाद

-: **<u>विवेचन</u>** :-

श्री. नटराज गोविंद सुर्यवंशी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा सहा. आयुक्त (मालमत्ता व्यवस्थापन) यांचेकडे खालील माहिती मिळणेबाबत दि.२२/०५/२०२४ रोजी अर्ज सादर केला.

- मिरा भाईंदर महानगरपालिका अंतर्गत असलेल्या परिवहन विभागामार्फत आस्थापनेमध्ये कंत्राटी मनुष्यबळ सेवा ही ज्या संस्थेच्या माध्यमातून पुरविण्यात आली आहे, त्या संस्थेचे सदर कालावधीमधील सर्व कागदपत्रे, कार्यादेश प्रत, करारनाम्यांची प्रत, सुरक्षा अमानत रक्कम भरलेली पावती, संस्थने आजपावेतो केलेल्या कार्यरत कर्मचाऱ्यांच्या नावे असलेल्या वेतनांच्या प्रती, संस्थेचे बँक पत्रक, ईपीएफ भरणा केलेल्यांची चलणे, देयकांच्या प्रती मिळाव्यात.

**<u>अपिल दाखल करण्याची कारणे:-</u>**

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत जनमाहिती अधिकारी यांनी अर्जदारास माहिती दिली नसल्याने दि. २२/०५/२०२४ रोजी अपिल दाखल करण्यात आलेले आहे.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी (परिवहन) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.२३/०७/२०२४ रोजी दुपारी १२.१५ वाजता सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मनपा/परिवहन/अ.आ.(१)/१४/२०२४-२५, दि. १६/०७/२०२४ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी (परिवहन) हे सुनावणीस उपस्थित आहेत.

**अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद:-**

जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

**जनमाहिती अधिकारी यांचा सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-**

अपिलार्थी यांनी अपेक्षिलेली माहिती अभिलखी उपलबध असलेली माहिती १५ दिवसांत देण्यात येईल.

**-: निर्णय :-**

१. अपिल मान्य करण्यात येत आहे.
२. जनमाहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी (परिवहन) यांनी अपिलार्थी अर्जदार यांना अभिलेखी उपलब्ध असलेल्या माहिती १५ दिवसांत नि:शुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.
३. सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(अनिकेत मानोरकर)**
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त आयुक्त (परिवहन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१. श्री. नटराज गोविंद सुर्यवंशी
शॉप नं.०५, श्रीकृष्ण अपार्टमेंट,
विमल डेअरी जवळ, शिर्डी नगर,
नवघर फाटक रोड, भाईंदर (पूर्व),
ता.जि.ठाणे ४०११०५.

२. जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासकिय अधिकारी (परिवहन),
मिरा भाईंदर महानगरपालिका

३. माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त आयुक्त (परिवहन) यांचे कार्यालय.

श्री नाईक (प्रशा-जन माहिती अधिकारी) कृपया मुदतीत माहिती देण्याची दक्षता घ्यावी.
30/07/2024